जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई

भूगोलशास्त्र विभाग

ग्रामीण लोकसंख्या सर्वेक्षण

(मौजे. एकसर ता.वाई)

दि. 24 मार्च 2023

**संयोजक व मार्गदर्शक**


प्रो- डॉ- विनोद वीर (एम.ए. पीएच.डी. नेट, सेट) प्रा.स्वप्निल कदम (एम.ए. नेट, सेट)

प्रा.तानाजी हाके (एम.ए. बी.एड.) प्रा. मनिषा शेवाळे (एम.ए. बी.एड.)

JANATA SHIKSHAN SANSTHA’S

# KISAN VEER MAHAVIDYALAYA,WAI

# (SATARA)

## DEPARTMENT OF GEOGRAPHY

### CERTIFICATE

This is certify that Shri /Miss. ________________________________________ is a bonafide student of this Department Studying in B.A PartIII and he/she has satisfactorily carried out the survey on **Population Survey of Village Ekssar**, Prescribed by the Shivaji University, Kolhapur for graduate degree course in GEOGRAPHY and that this survey report represented his/ her work in the year **2022-2023.**

Teacher-in-Charge

Head

Department of Geography

Date : / / 2023

**ग्रामीण लोकसंख्या सर्वेक्षण मौजे- एकसर**

**I** अनुक्रमणिका

**II** ऋणनिर्देशन

**III** नकाशासूची

**IV** आलेख सूची

**V** आकृती सूची

**VI** तक्तासूची

**१) प्रस्तावना**

अ) ग्रामीण लोकसंख्या सर्वेक्षणाचा हेतू व महत्व

ब) मौजे- एकसर भौगोलिक स्थान व भौगोलिक परिस्थीती

**२) एकसर लोकसंख्या**

अ) लोकसंख्या वयोगटरचना

३) शिक्षण

४) व्यवसाय

५) जातीनुसार लोकसंख्या

६) शेती

७) घरातील सोयी

८) कुटुंबाचे उत्पन्न

९) आजार

१०) स्थलांतर

११) घर

१२) गावातील सोई सुविधा

१३) गावातील समस्या व उपाय

१४) संदर्भग्रंथ

**III) नकाशासूची**

१) एकसर वसाहत आराखडा

२) वाई तालुक्यातील- एकसर स्थान

**IV) आलेख सूची**

१) वयोगटानुसार लोकसंख्या रचना

२) शैक्षणिक स्थिती

३) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

**V) आकृती सूची**

१) वयोगटानुसार लोकसंख्या रचना

३) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

**VI) तक्तासूची**

१) एकसर लोकसंख्या

२) लोकसंख्या वयोगटरचना

३) शैक्षणिक स्थिती

४) व्यवसाय स्थिती

५) जातीनुसार लोकसंख्येची वर्गवारी

६) कुटुंबाचे शेती क्षेत्र

७) घरातील सोयी

८) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

९) आजार

१०) स्थलांतर

११) घर

१२) गावातील सोयीसुविधा

## ● ऋणनिर्देशन ●

यावर्षी शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. भाग--३ भूगोल प्रात्याक्षिक पेपर क्रमांक १४ च्या अभ्यासक्रमाप्रमाणे ग्रामीण लोकसंख्या सर्वेक्षणासाठी मौजे. एकसर. ता. वाई निवडण्यात आले. या सर्वेक्षणाचे संयोजन व मार्गदर्शन मा. डॉ. विनोद वीर, प्रा. तानाजी हाके, प्रा.स्वप्निल कदम व प्रा. मनिषा शेवाळे यांनी केले. मी त्यांचा/त्यांची ऋणी आहे.

जनता शिक्षण संस्था व प्राचार्य डॉ. जी. जे. फगरे यांनी सर्वेक्षणाला परवानगी दिली व सहकार्य केले त्याबददल मी त्यांचा/त्यांची अत्यंत आभारी आहे. प्रयोगशाळा परिचर व कार्यालयीन कर्मचारी आणि सेवक यांनीही सहकार्य केले त्याबददल त्यांचेही आभार.

विद्यार्थ्याची सही :

नाव :.........................................................................

रोल नं. / परीक्षा नं :

**१) प्रस्तावना.**

**अ) ग्रामीण लोकसंख्या हेतू व महत्व.**

भारतामध्ये कितीही नागरीकरण झाले तरी आपला देश खेडयांचा आहे याची जाणीव ठेवणे महत्त्वाचे आहे त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठ बी.ए. भाग 3 च्या स्पे. भूगोल अभ्यासक्रमात खेडयांचा अभ्यास जाणीव पूर्वक ठेवलेला आहे. त्या दृष्टिने खेडे अभ्यासासाठी निवडले. खेडयातील लोकांचा व त्यांच्या जीवनमानाचा पर्यावरणाचा दृष्टिकोनातून अभ्यास केला तर या जीवनातील अनेक प्रश्न स्पष्ट होऊन त्याचे आकलन होऊ शकेल. तसेच त्यावरील योग्य उपायही सुचविता येतील व ग्रामीण जीवन सुधारेल.

लोकसंख्या बळावर राष्ट्र उभे राहते लोकांच्या कार्यक्षमतेवर सेवाभावी राष्ट्राभिमानीवृत्तीवर, शैक्षणिक तांत्रिक व वैज्ञानिक कुवतीनुसार नैसर्गिक साधनसंपत्तीचा लाभ घेत असते व नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन, संवर्धन करीत असते. (प्रकाश सावंत 1997 पेज नं 78) लोकसंख्या ही एक साधनसंपत्ती आहे. लोकसंख्येचे भौगोलिक वितरण, वाढ किंवा घट, लोकसंख्येची रचना, साक्षरता प्रमाण या प्रमुख अंगाचा व साधनसंपत्तीच्या विकासपातळीवर फार मोठा संबंध आहे. मानव आपल्या बुध्दीकौशल्याच्या जोरावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून घेत असतो व त्यातून आर्थिक उत्पादने निर्माण करतो. गुणात्मक वाढ झालेली लोकसंख्या उपलब्ध साधनसंपत्तीचा अधिक चांगला पध्दतीने वापर करून त्या खेडयांचा आर्थिक विकास चांगल्या प्रकारे करते व त्या गावातील लोकांचे राहणीमान उंचावते. त्या दृष्टिने गावातील लोकसंख्येची गुणवत्ता तपासण्यासाठी साक्षरता प्रमाण, लोकसंख्या वाढ, व्यावसायिक पातळी, स्थलांतर यांचा अभ्यास केला.

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागवण्यासाठी उत्पादनाची यंत्रणा उभारण्यासाठी प्रत्येक गावात, प्रदेशात पुरेसे व तरबेज मनुष्यबळ आवश्यक असते. यामुळेच त्या त्या गावातील, प्रदेशातील लोकसंख्या एक महत्वाची साधनसंपत्ती समजली जाते. सध्या जगातील जी आर्थिकदृष्टया विकसित राष्ट्रे आहेत. त्या देशातील लोक प्रत्येक कामात तरबेज, कुशल आहेत. त्या लोकांनी आपआपल्या देशातील उपलब्ध साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करून आर्थिक विकास साधला उदा. जपान, स्विर्झलॅड इ. या उलट द. अमेरिका व आफ्रिकेत विविध प्रकारची साधनसंपत्ती उपलब्ध असूनही त्याच्या आळशीपणा मुळे ते साधनसंपत्तीचा जास्त प्रमाणात विकास करू शकले नाहीत व ते आर्थिक दृष्टया मागासलेले राहिले. त्या दृष्टिने आम्ही मौजे एकसर ता. वाई हे खेडे अभ्यासासाठी निवडले व त्या गावातील लोकसंख्या या साधनसंपत्तीचा अभ्यास केला.

**ब)भौगोलिक स्थान व भौगोलिक परिस्थिती.**

मौजे एकसर. ता. वाई हे गाव वाई शहराच्या पश्चिमेंला सुमारे 06 कि.मी अंतरावर आहे. याचा अ़क्षवृत्तीय स्थान $17^0$56’07’’N, उत्तर व रेखावृत्तीय स्थान $73^0$50’37’’E, पूर्व आहे. एकसरचे एकूण क्षेत्र 463 हेक्टर इतके आहे.

**2) एकसर लोकसंख्या**:


तक्ता क्रमांक- १

एकसर –लोकसंख्या


| लिंग | स्त्रिया | % | पुरुष | % | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| लोकसंख्या | 972 | 52.28 | 887 | 47.72 | 1859 |
| सर्वेक्षित लोकसंख्या | 157 | 43.49 | 204 | 56.51 | 361 |

स्त्रोत: Census 2011


एकसर वसाहत आराखडा




**वाई तालुक्यातील मौजे एकसरचे स्थान**




आकृती क्रमांक- १




ग्रामीण लोकसंख्या सर्वेक्षणासाठी आम्ही एकसर हे गाव निवडले या गावातील 100 कुटुंबांचे दि- 24/03/2023 रोजी सर्वेक्षण केले. एकसरची एकुण सर्वेक्षित लोकसंख्या 361 असून त्यापैकी 157 स्त्रीया व 204 पूरुष आहेत. एकूण सर्वेक्षित लोकसंख्येत 43.11% स्त्रीया व 56.89% टक्के पुरुष आहेत.

**अ) लोकसंख्येची वयोगट रचना:**

आलेख क्रमांक- 1




तक्ता क्रमांक- 2

| वयोगट | पुरुष | % | स्त्रि | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| **0-20** | 40 | 11.08 | 37 | 10.25 | 77 | 21.33 |
| **21-40** | 78 | 21.61 | 48 | 13.30 | 126 | 34.90 |
| **41-60** | 57 | 15.79 | 59 | 16.34 | 116 | 32.13 |
| **61-80** | 25 | 6.93 | 12 | 3.32 | 37 | 10.25 |
| **80 <** | 4 | 1.11 | 1 | 0.28 | 5 | 1.39 |
| **एकूण** | **204** | **56.51** | **157** | **43.49** | **361** | **100** |

स्त्रोत: प्राथमिक माहिती: (24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

लोकसंख्या वयोगट रचनेवरुन कोणत्या वयोगटात किती लोकसंख्या आहे हे लक्षात येते. येथे वयोगटानुसार लोकसंख्या जोडस्तंभालेखातून दर्शविली आहे. एकसर ची वयोगट रचना आलेख क्रमांक- 1 वरुन लक्षात येईल. एकसर मध्ये अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या 0.88 टक्के व 60 पेक्षा जास्त वयाच्या लोकांची संख्या 11.64 टक्के आहे.

गावातील 100 कुटुंबांचे सर्वेक्षण केले. गावात एकूण 157 स्त्रिया व 204 पुरुष आहेत. एकसरचे लिंगगुणोत्तर दर हजार पुरुषांमागे 892 स्त्रिया असे आहे.

**३) शिक्षण**


तक्ता क्रमांक- 3

शैक्षणिक स्थिती

| शिक्षण | स्त्रि | % | पुरुष | % | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| **4 थी** | 24 | 6.648 | 37 | 10.25 | 61 | 16.90 |
| **5-10 वी** | 43 | 11.911 | 61 | 16.90 | 104 | 28.81 |
| **10-12वी** | 30 | 8.310 | 42 | 11.63 | 72 | 19.94 |
| **15 वी** | 17 | 4.709 | 23 | 6.37 | 40 | 11.08 |
| **इतर** | 18 | 4.986 | 21 | 5.82 | 39 | 10.80 |
| **अशिक्षीत** | 25 | 6.925 | 20 | 5.54 | 45 | 12.47 |
| **एकुण** | **157** | **43.49** | **204** | **56.51** | **361** | **100.00** |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती:-( 24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

**आलेख क्रमांक- 2**




ज्या व्यक्तिला लिहिता वाचता येते त्या व्यक्तिला साक्षार असे म्हणतात. एकसर मध्ये एकूण साक्षरतेचे प्रमाण 87.53 टक्के आहे. साक्षरतेमुळे आपली आर्थिक, मर्यादीत आपत्ती सोसण्याची ताकद, आरोग्य, मानवता व इतर व्यवहारिक गोष्टींचे आकलन होते. व त्यामुळे गावाची देशाच्या आर्थिक विकासास मदत होते. एकसर मध्ये पुरुषांपेक्षा साक्षार स्त्रीयांचे प्रमाण कमी आहे. ते 13.02 टक्के कमी आहे. एक पुरुष व स्त्री साक्षार होण्यामागे संपूर्ण कुंटुंब साक्षार होणे होय. त्यामुळे या दोघांच्या साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे.

एकसर मधील एकूण शैक्षणिक पातळीचा विचार केला असता 5 वी व 10 वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या व्यक्तींची संख्या सर्वात जास्त असून त्यामध्ये पुरुषांची संख्या आधिक आहे. या गटातील लोकांची संख्या गावातील एकूण लोकसंख्येच्या 28.81 टक्के आहे. तर प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांची संख्या 16.90 टक्के आहे. एकसर मध्ये पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या लोकांची संख्या 11.08 टक्के आहे.

**४)व्यवसाय:-** मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा भागविण्यासाठी त्याला काहीतरी काम करावे लागते. त्यास व्यवसाय असे म्हणतात. आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी मानव सतत वेगवेगळे व्यवसाय करतो. भारतातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हा आहे.

तक्ता क्रमांक- 4

एकसर -व्यवसाय स्थिती :-

| व्यवसाय | स्त्रि | % | पुरुष | % | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| शेती | 53 | 14.68 | 71 | 19.67 | 124 | **34.35** |
| गृहिणी | 33 | 9.14 | 0 | 0.00 | 33 | **9.14** |
| मजुरी | 21 | 5.82 | 33 | 9.14 | 54 | **14.96** |
| शिक्षण | 27 | 7.48 | 29 | 8.03 | 56 | **15.51** |
| सुतारकाम | 0 | 0.00 | 9 | 2.49 | 9 | **2.49** |
| वाहनचालक | 0 | 0.00 | 12 | 3.32 | 12 | **3.32** |
| नोकरी | 12 | 3.32 | 23 | 6.37 | 35 | **9.70** |
| दुकान | 11 | 3.05 | 27 | 7.48 | 38 | **10.53** |
| **एकूण** | **157** | **43.49** | **204** | **56.51** | **361** | **100.00** |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती: (24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर मध्ये असणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी 34.35 टक्के लोक शेती, 14.96 टक्के मजूरी व 9.70 टक्के लोक नोकरी करतात.तसेच दुकानदारी व्यवसायात 10.53 टक्के लोक गुतंले आहेत. यात सर्वात कमी म्हणजे अनुक्रमे 2.49 व 3.32 टक्के लोक सुतारकाम व वाहनचालक, व्यवसाय करतात.

एकसर मध्ये एकही पुरुष घरकामात नाही. त्याचप्रमाणे सुतारकाम व वाहनचालक यामध्ये ही एकही महिला काम करत नाही. तर पुरुष हे घरकाम वगळता सर्वच क्षेत्रात काम करताना दिसतात.

**५) जातीनुसार लोकसंख्या:-**

तक्ता क्रमांक- 5: एकसर - जातीनुसार लोकसंख्येची वर्गवारी:-

| जात | स्त्रि | % | पुरुष | % | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठा | 94 | 26.04 | 101 | 27.98 | 195 | 54.02 |
| बौध्द | 41 | 11.36 | 63 | 17.45 | 104 | 28.81 |
| सुतार | 12 | 3.32 | 25 | 6.93 | 37 | 10.25 |
| चर्मकार | 10 | 2.77 | 15 | 4.16 | 25 | 6.93 |
| एकूण | 157 | 43.49 | 204 | 56.51 | 361 | 100.00 |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती:-(24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर मध्ये जातीनुसार वर्गवारी पहिल्यास गावात मराठा समाजाची लोकसंख्या सर्वाधिक म्हणजे 54.02 टक्के आहे. तसेच सर्वात कमी लोकसंख्या चर्मकार समाजातील म्हणजे 6.93 टक्के आहे.तर बौध्द व सुतार या समाजातील लोकसंख्या अनुक्रमे 28.81 टक्के व 10.25 टक्के असलेली दिसून येते. इतर कोणूत्याही जातीचे लोक येथे आढळत नाहीत.

**६) शेती:-**

तक्ता क्रमांक-**6**

कुटुबांचे शेतीक्षेत्र

| शेती | सध्या उपलब्ध असणारी शेतजमीन | |
|---|---|---|
| | कुटुबांची संख्या | % |
| 1 एकर पेक्षा कमी | 49 | 49.00 |
| 1 ते 2.5 एकर | 29 | 29.00 |
| 2.5 एकर पेक्षा जास्त | 17 | 17.00 |
| शेती नाही | 5 | 5.00 |
| एकूण | **100** | 100.00 |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती:-( 24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर या ठिकाणी विस्तृत अशी शेती आढळत नाही. याच्या वर्गवारीनुसार अनुक्रमे 1 एकर पेक्षा कमी 49%, 1 ते 2.5 एकर मध्ये 29% व २.५ एकर पेक्षा जास्त 17% कुंटुंबांना यावरुन असे निदर्शनास येते की, 1 एकर पेक्षा कमी क्षेत्र असणाऱ्या कुंटुंबाची संख्या जास्त आहे. तर 2.5 एकर पेक्षा जास्त शेती ही कमी शेतकरी कुटुंबांना आहे. तर 5% कुंटुंबांना शेती नाही.

**७) घरातील सोयी**

तक्ता क्रमांक 7

घरातील सोयी

| घरातील सोयी | होय | % | नाही | % |
|---|---|---|---|---|
| वीज | 97 | 97 | 3 | 3 |
| नळ | 87 | 87 | 13 | 13 |
| शौचालय | 83 | 83 | 17 | 17 |
| न्हाणीघर | 98 | 98 | 2 | 2 |
| टी व्ही | 84 | 84 | 16 | 16 |
| फ्रिज | 41 | 41 | 59 | 59 |
| रेडिओ | 3 | 3 | 97 | 97 |
| संगणक | 17 | 17 | 83 | 83 |
| सांडपाणी | 68 | 68 | 32 | 32 |
| मोबाईल | 100 | 100 | 0 | 0 |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती:( 24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर मध्ये सध्या एकूण 97.00 टक्के घरामध्ये वीज आहे. त्याचप्रमाणे 87.00 टक्के नळ तर शौचालयाची 83.00 टक्के सोय आहे. न्हाणीघर हे सर्वात गरजेचे आहेच. त्यामुळे ते 98.00 टक्के आहे. टि.व्ही. हि महत्वाची गरज झाली आहे. त्यामुळे 84.00 टक्के त्याचे प्रमाण आहे. फ्रिज एकूण 41.00 टक्के तर अनेक घरात रेडिओ देखिल आहे त्याचे प्रमाण 3.00 टक्के तर सांडपाणी सोय व मोबाईल अनुक्रमे 68.00 टक्के व 100.00 टक्के आहे. संगणक 17.00 टक्के घरात आहे.

**८) कुटुंबाचे उत्पन्न:-**


तक्ता क्रमांक 8

वार्षिक उत्पन्न:

| वार्षिक उत्पन्न | कुटुंब | % |
|---|---|---|
| 20000> | 11 | 11 |
| 20000-100000 | 59 | 59 |
| 1-2 लाख | 23 | 23 |
| 2 लाख< | 7 | 7 |
| एकुण | **100** | **100** |

स्रोत:- प्राथमिक माहिती (24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

आलेख क्रमांक- 3




एकसर मध्ये 20000-100000 लाख उत्पन्न असलेल्यांची संख्या जास्त आहे. तसेच 11 टक्के कुटुंबाचे उत्पन्न 20000 रुपयांपेक्षा कमी आहे. यात सर्वात कमी 7 टक्के कुटुंबांचे उत्पन्न 2 लाखापेक्षा जास्त आहे. तर 1 ते 2 लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असणारे कुटुंबे 23 टक्के आहेत.

**९) आजार:-**

तक्ता क्रमांक- 9

आजार

| आजार | स्त्रि | % | पुरुष | % |
|---|---|---|---|---|
| हृदयविकार | 0 | 0 | 3 | 0.83 |
| सांधेदुखी | 4 | 1.11 | 3 | 0.83 |
| मधुमेह | 5 | 1.39 | 5 | 1.39 |
| रक्तदाब | 2 | 0.55 | 0 | 0.00 |
| दमा | 3 | 0.83 | 3 | 0.83 |
| अर्धांगवायू | 0 | 0.00 | 1 | 0.28 |
| डोळेदुखी | 0 | 0.00 | 2 | 0.55 |
| गुडघेदुखी | 5 | 1.39 | 6 | 1.66 |
| एकूण | 19 | 5.26 | 23 | 6.37 |

स्त्रोत: प्राथमिक माहिती:( 24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर येथील लोकांना काही आजार देखील आहेत. 5.26 टक्के स्त्रियांमध्ये व 6.37 पुरुषांमध्ये विवीध व्याधी आढळतात. स्त्रियामध्ये मधुमेह व रक्तदाबाचे प्रमाण जास्त आढळून येते.. तसेच दमा व सांधेदुखीचे प्रमाण ही प्रत्येकी 1.94 टक्के आढळते. त्याचबरोबर पुरुषांमध्ये मधुमेहाचे 1.39 टक्के व गुडघेदुखीचे 1.66 टक्के प्रमाण प्रामुख्याने आढळते. इतर व्याधींचे प्रमाण फारसे नाही. परंतू हृदयविकार, डोळेदुखी, दमा व अर्धांगवायू 2.49 टक्के पुरुषांमध्ये आहे.

**१०) स्थलांतर:-** तक्ता क्रमांक -10

स्थलांतरित झालेली कुंटूंबे

| स्थलांतरित | % | अस्थलांतरित | % | एकुण |
|---|---|---|---|---|
| 17 | 17 | 83 | 83 | 100 |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती:( 24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर गावातून 17 टक्के कुंटूंब स्थलांतरीत झाली आहेत. तर 83 टक्के कुंटूंबाचे स्थलांतर झालेले नाही असे दिसून येते. आहेत. गाव व परिसरातील शिक्षण व नोकरीच्या अपूऱ्या संधी यामुळे एकसर मधील लोक स्थलांतर करताना आढळत आहेत.

**११) घर** तक्ता क्रमांक- 11 सध्या घराची स्थिती

| दगडमाती | % | सिमेंट कॉंक्रीट | % | एकूण |
|---|---|---|---|---|
| 27 | 27 | 73 | 73 | 100 |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती:( 24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

एकसर गावामध्ये पिकांसाठी चांगले हवामान, वाई शहराची नजीकता, मुंबई, पुणे, सातारा या शहरांमध्ये व्यवसाय व नोकरीसाठी स्थलांतर केलेले कुटुंबीय यामुळे उत्पादनात वाढ होउन आर्थिक स्थिती सुधारलेली आहे. याचा परिणाम म्हणजे या गावात 73 टक्के घरे ही सिमेंट कॉंक्रीटची आहेत.

**१२) गावातील सोयी सुविधा:-** तक्ता क्रमांक- 12

**गावातील सोयी सुविधा**

| सुविधा | आहे | % | नाही | % | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| आरोग्य | 93 | 93 | 7 | 7 | 100 |
| शिक्षण | 97 | 97 | 3 | 3 | 100 |
| रस्ते | 91 | 91 | 9 | 9 | 100 |
| एस.टी. बस | 98 | 98 | 2 | 2 | 100 |
| खाजगी वाहतूक | 89 | 89 | 11 | 11 | 100 |
| वाचनालय | 45 | 45 | 55 | 55 | 100 |
| प्रार्थनास्थळे | 78 | 78 | 22 | 22 | 100 |
| क्रिडांगण | 53 | 53 | 47 | 47 | 100 |
| मनोरंजन | 73 | 73 | 27 | 27 | 100 |
| हॉल | 76 | 76 | 24 | 24 | 100 |
| पाणी | 86 | 86 | 14 | 14 | 100 |
| सांड पाणी | 79 | 79 | 21 | 21 | 100 |
| प्रशिक्षण | 69 | 69 | 31 | 31 | 100 |
| व्यायामशाळा | 53 | 53 | 47 | 47 | 100 |

स्त्रोत:- प्राथमिक माहिती: (24/03/2023 रोजी सर्वेक्षण करुन मिळाली)

**१३) गावातील समस्या व उपाय-**

ग्रामसर्वेक्षणानंतर गावात पुढील प्रमुख समस्या आढळल्या

- गावात स्वच्छतेचा मोठा प्रश्न असलेला दिसून येतो.
- गावातील वस्तीवर खराब व अरुंद रस्ता आहे.
- खुली गटारे
- गावात खाजगी वाहतूक सोय अपूरी आहे.
- गावात वाचनालय, मनोरंजनाच्या सोयींचा अभाव आहे.
- मुलांसाठी खेळण्यासाठी स्वतंत्र क्रिडांगण नाही.
- गावातील व्यायामशाळेत सोयी सुविधाचा अभाव दिसून येतो.
- स्थानिकांना रोजच्या भाजीपाल्यासाठी वाई शहरात जावे लागते. गावात मंडई भरत नाही.

**उपाय**:-

गावाच्या विकासाच्या दृष्टीने काही प्राथमिक सुविधा पुरविणे आवश्यक आहे. उदा. रस्त्यांची सोय झाली पाहिजे. वस्त्यांवर जाण्यासाठी किंवा गावांतर्गत पक्के रस्त्याची सोय केली पाहिजे. गावातील शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न झाले पहि्जेत. गावात अध्ययावत व्यायामशाळा, वाचनालये उभारवायास हवी. गावातील लोकांची आर्थिक स्थिती आधिक भक्कम बनविण्यासाठी छोटे कुटीरोद्योग सुरु करावयास हवेत.

**१४) सदर्भग्रंथ**


1. वसाहती भूगोल : प्रा. के. ए. खतीब
2. उपयोजित भूगोल : प्रा. के. ए. खतीब
3. लोकसंख्या भूगोल : डॉ. विठ्ठल घारपुरे
4. लोकसंख्या भूगोल : प्रा.अहिरराव व इतर
5. सामाजीक सांस्कृतीक भूगोल : डॉ. विठ्ठल घारपुरे
6. पर्यटन भूगोल: प्रा.के.ए.खतीब
7. प्रात्यक्षिक भूगोल : डॉ. अर्जुन कुंभार
8. भारताचा भूगोल : प्रा.के. ए. खतीब
9. मानवी भूगोल : डॉ. प्रकाश सांवत
10. सातारा जिल्हा सामाजिक व आर्थिक विश्लेषण अहवाल